केसरी पुणे, ११ मार्च २०१७

# आदर्श मातांचा सत्कार



पुणे : जागतिक महिला दिना निमित्त ढोले पाटील रस्त्यावरील कै.शांताबाई ढोले पाटील माध्यमिक विद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. पंख सामाजिक संस्था आणि क्विकहिल फाऊंडेशन यांच्या विद्यमानाने शाळांगण प्रकल्पा अंतर्गत हा कार्यक्रम आयोजित केला गेला.

खडतर परिस्थितीत देखील काबाड कष्ट करून आपल्या मुलांना शिक्षणाची कास धरायला लावणाऱ्या तसेच अशिक्षितपणामुळे ज्या अडचणी आम्हाला आल्या त्या आपल्या मुला-मुलींच्या नशिबी येऊ नये म्हणून सतत धडपडणाऱ्या आदर्श मातांचा सत्कार करण्यात आला.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक डॉ. न.म.जोशी उपस्थित होते तसेच शिक्षणाधिकारी दिपक माळी, क्विकहिल फाऊंडेशनचे अध्यक्ष अजय शिर्के आणि ढोले पाटील शाळेचे मुख्याध्यापक वाल्मीक हजारे उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांची नात महिला शाहिर सौ.विनिता जोशी यांनी रचलेला झाशीच्या राणीच्या शौर्यावर आधारित पोवाडा मुलांनी सादर केला.पंख संस्थेच्या संचालिका स्मिता आपटे यांनी महिला दिनानिमित्त आदर्श मातांना समर्पित कविता सादर केली. त्यानंतर सत्कार करण्यात आलेल्या आदर्श मातांनी आपले मनोगत व्यक्त केले.